जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2024
लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित केलेल्या नाट्य कार्यशाळेतील विद्यार्थ्यांसह मान्यवर उपस्थित होते.

# राज्यभरातील विद्यार्थ्यांनी घेतले अभिनयाचे धडे

## संगीत, नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे २९ ते ३१ मे या कालावधीत नाट्य कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

राज्यभरातील २० पेक्षा अधिक विद्यार्थी कार्यशाळेत सहभागी झाले होते. या कार्यशाळेत डॉ. राजश्री खटावकर यांनी 'नाटकातील अभिनय' या विषयावर विकास कांबळे यांनी 'नाट्यलेखन विचार' याविषयी, अभिनेता युवराज केळुसकर यांनी 'रंगमंच तंत्र' तर डॉ. संजय तोडकर यांनी 'दिग्दर्शनाची कार्यपद्धती' यावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमध्ये दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. तर संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी सहभागींना नाटक या विषयावर पुस्तके भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले.

01 JUN 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

# अहिल्यादेवी होळकर यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर, ता. ३१ : राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षास आजपासून प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठात अहिल्यादेवींना जयंतीनिमित्त आज अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, आयक्यूएसी संचालक डॉ. सागर डेळेकर, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार, अविनाश भाले, किशोर खिलारे, अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान, अहिल्यादेवी यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षारंभाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या वाहिनीसाठी ज्येष्ठ नेते अण्णासाहेब डांगे यांच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि समकाळ' या जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी घेतलेल्या विशेष मुलाखतीचे पुनर्प्रसारण करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2024
पुण्यनगरी

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षास शुक्रवारपासून सुरुवात झाली. शिवाजी विद्यापीठात अहिल्यादेवींना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, आयक्यूएसी संचालक डॉ. सागर डेळेकर, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, अविनाश भाले, डॉ. किशोर खिलारे, ॲड. अभिषेक मिठारी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठातील नाट्य कार्यशाळेची सांगता

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दि. २९ ते ३१ मे या कालावधीत नाट्य कार्यशाळा उत्साहात झाली. कार्यशाळेत २० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. गुरुवारच्या सत्रामध्ये नाट्यकलाकार डॉ. राजश्री खटावकर यांनी 'नाटकातील अभिनय', लेखक विकास कांबळे यांनी 'नाट्यलेखन विचार' तर शुक्रवारी अभिनेता युवराज केळुसकर यांनी 'रंगमंच तंत्र' आणि अभिनेता डॉ. संजय तोडकर यांनी 'दिग्दर्शनाची कार्यपद्धती', अनुप जत्राटकर यांनी 'चित्रपट माध्यम आणि रंगभूमी यामधील समन्वय' या विषयावर मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
01 JUN 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'तंत्रज्ञान'च्या १७० विद्यार्थ्यांची निवड

## शिवाजी विद्यापीठ : कॅम्पस ड्राइव्हमधून विविध कंपन्यांत संधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधून २०२३-२४ यावर्षी १७० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राइव्हमधून अनेक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विविध पदांवर निवड झाली आहे. हे यशस्वी विद्यार्थी अधिविभागाच्या विविध अभियांत्रिकी शाखांमधून पदवीच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेत आहेत.

औद्योगिक क्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मोठ्या वापरामुळे अभियांत्रिकी क्षेत्रातील रोजगारांचे प्रमाण वाढत असून, त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान व नाविन्यपूर्ण अभियांत्रिकी शिक्षण, अधिविभागात दिले जाते.

येथील विविध शाखांचा अभ्यासक्रम औद्योगिक कौशल्ये, संशोधन व गुणवत्ता विकास आधारित असल्यामुळे विद्यार्थी सक्षम अभियंता बनण्यास मदत होते. निवड झालेले विद्यार्थी कंपन्यांमध्ये उत्तम कामगिरी बजावत असल्याने अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राइव्हच्या माध्यमातून अंतिम वर्षात रोजगाराची संधी उपलब्ध करून देत आहेत. यावर्षी अधिविभागातून ५०पेक्षा अधिक नामवंत कंपन्यांनी विद्यार्थ्यांना वर्षाला ३ ते ५ लाखांची पॅकेजेस देऊन निवड केली.

'तंत्रज्ञान'च्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर प्राधान्यासाठी तसेच अधिविभाग औद्योगिक संशोधन केंद्र बनावे, यासाठी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना रोजगार संधी मिळाव्यात व तंत्रज्ञान अधिविभागाला संशोधन गुणवत्ता केंद्र बनवण्यासाठी संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली, विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी गणेश पाटील, आदी कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2024
सकाळ



शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थी, पालकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2024
पुढारी



# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्रास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागात २०२४ - २५ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी, पालकांच्या सुविधेसाठी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्रास प्रारंभ झाला आहे. केंद्रामध्ये अभियांत्रिकी म्हणजे काय, अभ्यासक्रमाचे स्वरूप, विविध शाखा, शाखांची निवड कशी करावी, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, त्या अनुषंगाने होणारे बदल, भविष्यात असणाऱ्या रोजगार संधी, उच्च शिक्षणाच्या संधी, विविध स्कॉलरशिप, विद्यापीठाच्या विविध योजना, सीमा भागातील मुलांच्यासाठी फी सवलत व मोफत वसतिगृह योजना याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे व प्रवेश प्रक्रियेचे स्वरूप याविषयीची माहिती देऊन शंकांचे निरसन केले जाणार आहे. प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2024
सकाळ

# 'कलाप्रबोधिनी'त बॅचलर ऑफ डिझाईन इंटिरिअरला प्रवेश सुरू

कोल्हापूर : कलाप्रबोधिनी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन शिवाजी विद्यापीठ संलग्नित संस्थेत बॅचलर ऑफ डिझाईन (बी. डेस) इंटिरिअर डिझाईन या चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. या अभ्यासक्रमासाठी टक्केवारीची अट नाही. कोणत्याही नीट, सीईटी या पात्रता परीक्षेची गरज नाही. अभ्यासक्रमासाठी ४० विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. महाविद्यालयाला नॅकचे मानांकन प्राप्त झाले असून अभ्यासक्रमासाठी बारावी आर्टस्, कॉमर्स, सायन्स तसेच एमसीव्हीसी झालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. तसेच पदविकाधारकांना थेट बॅचलर ऑफ डिझाईन (बी. डेस) इंटिरिअर डिझाईनच्या दुसऱ्या वर्षात प्रवेश घेता येऊ शकतो. कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर मान्यताप्राप्त तीन वर्षांचा डिप्लोमा इन इंटिरिअर डिझाईन अँण्ड डेकोरेशन अभ्यासक्रमाला दहावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. इच्छुक विद्यार्थ्यांनी संबधित अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याचे आवाहन कलाप्रबोधिनीतर्फे करण्यात आले आहे.